ISSN 2231-1629
Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# एकविसाव्या शतकातील मराठी कादंबरी विश्व

***कु. वैषाली रामचंद्र धापोडकर***
(CHB प्राध्यापक) मराठी विभाग
सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर

'कादंबरी' हा जागतिक पातळीवर लोकप्रियता प्राप्त झालेला असा वाङःमय प्रकार आहे. 'कादंबरी' हा आधुनिक काळात उदयाला आलेला प्रकार मानला असला तरी त्याची पाळेमुळे प्राचीन वाङःमयात सापडतात. कथा कादंबरीचे आकर्षण मानवाला प्राचीन काळापासून आहे. संस्कृत, प्राकृत या भाषांमध्ये कथा आख्याने विपुल प्रमाणात सापडतात. 'कादंबरी' या संस्कृत भाब्दाचा अर्थ 'सरस्वती कोकिळा' असा आहे. 'कथेचे दीर्घरुप' म्हणजे कादंबरी असेही म्हणता येईल. कादंबरी या वाङःमयाचा विकास मात्र पाश्चात्य देशामध्ये झाला. अठराव्या भातकात तिचे रुप उत्क्रांत झाले आणि एकोणविसाव्या भातकात एक प्रधान साहित्यप्रकार म्हणून वाङःमयात कादंबरीला मान्यता मिळाली.

पाश्चात्य कादंबरीच्या धर्तीवर मराठी कादंबरीने हळूहळू मूळ धरले. कादंबरीच्या विकासाच्या दृष्टीने तत्कालीन काळातील वातावरण अनुकूल – प्रतिकूल अशा समिश्र स्वरुपाचे होते. तरी ही कादंबरीरुपी बीजाच्या मूळाने चांगलाच जोम धरुन मोठ्या वृक्षात रुपांतर झाले असेच म्हणावे लागेल. जसजसे समाजपरिवर्तन होत गेले तसा काळही बदलू लागला. माणसांच्या विचारांमध्ये परिवर्तन होत गेले. या साऱ्यांचा परिणाम सर्व साहित्य प्रकारांवर झाला. तो कादंबरीवरही झाला. काळपरिवर्तनाबरोबरच कादंबरीचे रुपही बदलत गेले. नवनवीन वाटा चोखाळल्या. कादंबरी वाङःमयाचा जसजसा विकास होत गेला तसतसे नवे प्रवाह निर्माण होत गेले. पौराणिक, ऐतिहासीक, सामाजिक, चरित्रात्मक, राजकीय त्याचबरोबर दलित आणि ग्रामीण हे प्रमुख साहित्यप्रवाहही निर्माण झाले. आजची कादंबरी विविध प्रवाहांनी समृध्द अशी झाली आहे. मराठी कादंबरी वाङःमयाचे दालन एक समृध्द दालन म्हणून नावारुपास आलेले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात व्यक्ती स्वातंत्र्याला महत्व आल्याने माणूस वा त्याच्या जाणिवा बदलू लागल्या. बदलत्या काळाची स्पंदने हा लेखकाच्या सृष्टीचा महत्वाचा घटक आहे. या बदलाच्या पार्श्वभूमीवर मराठी कादंबरीला भान या काळात आलेले दिसते. आशय व अविष्कार यांच्यातील विविधतेच्या दृष्टीने कादंबरीला समृध्द करणारा, हा या काळाचा महिमाच मानावा लागतो. स्वातंत्र्योत्तर काळात दलित, ग्रामीण, प्रादेशिक, स्त्रीवादी अशा विविध अंगाने कादंबरी लिहिली जाऊ लागल्याने मराठी कादंबरीला नवनवीन आशय प्राप्त होऊ लागला. या काळात सिगमंड फ्राईड, कार्ल मार्क्स, महात्मा गांधी, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर अशा अनेक विचारवंतांच्या विचार मंथनातून सर्व समाज घटकांना अस्तित्वाचे भान आले. अशा बदलाच्या प्रक्रियेचे चित्रण कादंबरीत आलेले दिसते. त्यामुळे मराठी कादंबरीत व्यापकता आली. एकोणविसाव्या शतकाच्या मध्यास कादंबरी वाङःमयाचा प्रारंभ झाला. त्यात मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी म्हणून बाबा पदमनजींच्या 'यमुनापर्यटन' (1857)चे नाव देता येईल.

जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे जगाच्या आर्थिक व्यवहारांचे चित्र जसे बदलले, तसे सगळे सगळे देशही एकमेकांच्या खूप जवळ आले. स्वाभाविकच संस्कृती, साहित्य, कला यांसारख्या गोष्टींची देवाण घेवाणही होऊ लागली. याचे पडसादही सगळीकडे उमटू लागले. त्यामुळे स्त्रियांची जीवन शैलीही बदलली स्त्रिया स्वतःच्या सर्व क्षमता आजमावून पाहू लागल्या. या बाबतीतले सामाजिक संकेत ही झुगारले जाऊ लागले. हे सारे स्त्रियांच्या लेखनामधूनही दिसू लागले. कादंबरी या वाङःमयप्रकारापुरताच विचार करायचा म्हटले तरी, गौरी देशपांडे ते मेघना पेठे यांच्या लेखनातून याचे प्रत्यंतर येऊ लागले. वेगवेगळे विषय कोणताही संकोच न बाळगता हाताळले जाऊ लागले. असे लेखन करणाऱ्या स्त्रियांची संख्या जरी कमी असली, तरी कधी पारंपारिककतेला झुगारुन, कधी न झुगारता वेगळ्या दिशेने लेखन सुरु झाले हे महत्वाचे आहे. कधी लेखन जमले, कधी फसले, असे जरी सले तरी स्त्रिया वैचारिक, मानसिक विकासाच्या दिशेने पावले पुढे टाकीत चालल्या आहेत असे चित्र या लेखिकांच्या कादंबऱ्यात दिसते.

2001 ते 2010 या कालखंडातील काही लेखक वा लेखिकांच्या निवडक कादंबऱ्याचा विविध प्रकारांमध्ये वर्गीकरण करुन येथे आढावा घेतला आहे.

**एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कादंबरी**

लेखक जेथे जन्मला, जेथे वाढला, ज्या निसर्गाच्या सानिध्यात मनसोक्तपणे जगला, तेथील परिसराच्या रंगगंधासह बऱ्या वाईट अनुभवासह तो बरेच काही शिकला या अनुभवातूनच त्यांच्या लेखनीने ग्रामीण साहित्याला आकार दिला.

1980 च्या दरम्यान खेड्यातील एकूणच समाजजीवन बदलले. ग्रामीण भागातील शिक्षित झालेला लेखक वर्ग स्वतःला आलेले अनुभव आणि ग्रामीण भागाचे चित्रण ग्रामीण साहित्यात करु लागला.

एकविसाव्या शतकात ग्रामीण साहित्यवि वात अग्रेसर म्हणून प्रा. सदानंद देशमुख या लेखकांचा उल्लेख करणे आवश्यक ठरते. ग्रामीण साहित्यातील नव्या दमाचे ग्रामीण लेखक प्रा. सदानंद देशमुख यांनी ग्रामीण साहित्यात मोलाची अशी भर घालून स्वतःचा असा एक वेगळा ठसा निर्माण केला आहे. 21 व्या शतकाच्या उंबरठयावरचे बदलते खेडे तेथील ग्रामीण जीवन आणि निसर्गाशी चालणारा जीवनसंघर्ष याचे चित्रण 'तहान' (1998) या कादंबरीत आले आहे. धगधगत्या ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण करुन ग्रामीण साहित्याला एका वेगळ्या उंचीवर

घेऊन जाण्याचे कार्य केले आहे. या नव्या लेखकाने ग्रामीण साहित्यातून वर्तमानाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.
बदलते खेडे आणि तेथील जीवन पध्दती, ग्रामीण जीवनातील भेडसावणारे प्रश्न, मनाची होणारी घुसमट, वेदना, त्याचबरोबर विद्रोह याचे चित्रण त्यांनी कथा कादंबऱ्यातून साकार केले आहे. त्यांनी पाहिलेले अनुभवलेले दुःख, दारिद्र्य यांचा आलेखच कादंबरीतून रेखाटला आहे.
धगधगते ग्रामीण जीवन वाचकांसमोर उभे करण्याचे सामर्थ्य सदानंद देशमुख यांच्या लेखनीत दिसून येते. 'तहान' (1998), 'बारोमास' (2002) या दोन ग्रामीण कादंबऱ्यांनी मराठी ग्रामीण कादंबरीला एका उंचीवर नेऊन पोहचविले आहे. सदानंद देशमुख यांनी या दोन कादंबऱ्यातुन 21 व्या शतकातील ग्रामीण वास्तव वाचकांसमोर साकार केले आहे. उल्लेखनीय कामगिरीसाठी 'नवग्रामीण साहित्याचा जीवनयात्री' असा गौरव लोकसत्ता या वृत्तपत्रात केला आहे. देशमुख यांच्या लेखणीत अजुनही ग्रामीण वास्तव साकार करण्याची तितकीच तेजस्वी धार असल्याचे दिसून येते.

**सामाजिक कादंबरीः**

या कादंबऱ्यांना सामाजिक संदर्भ असतो. विशिष्ट देशाचाच एक भाग असलेली विविध व्यवसायाची, वयाची, स्वभावाची माणसे असलेला समाज या कादंबऱ्यातून दर्शविला जातो. त्यातील माणसे विशिष्ट संस्कृतीचे नमुने असतात. त्यासाठी माणसा—माणसामधील परस्पर व्यवहाराचे चित्रण ही कादंबरी विशषत्वाने करीत असते. या संदर्भात प्रभा गणोरकर लिहीतात,
"सामाजिक कादंबरीचे वैशिष्ट्ये हे असते की, ती परिवर्तनशील गतिशीलतेवर लक्ष केंद्रित करते. त्यामुळे काळानुसार, परिस्थितीतील बदलानुसार मानवी संबंधामध्ये कसा फरक पडत जातो याचे चित्रण ती करते. त्यामुळेच सामाजिक कादंबरी सतत गतिमान असलेल्या काळाचे भान देते. काळानुसार बदलत जाणाऱ्या सांस्कृतिक आणि आर्थिक परिवर्तनाचे मानवी वर्तनावर कसे—कसे परिणाम होतात याचे चित्रण सामाजिक कादंबरी करते.
'वारुळ' (2004) ही बाबाराव मुसळे यांची तिसरी कादंबरी 'साकेत' प्रकाशन औरंगाबाद व्दारे प्रकाशित झाली. 'वारुळ' एक सामाजिक कादंबरी आहे. ग्रामीण भागातल्या मागासलेल्या, पिढ्यानपिढ्या दलित समजलेल्या मातंग समाजाच्या तीन पिढ्यांचे विदारक जीवनाचित्रण या कादंबरीत लेखकाने रेखाटले आहे. या कादंबरीची व्याप्ती, अवकाश मोठा आहे. 1980 ते 2004 पर्यंतच्या सर्व घटना त्यांच्या बारीक सारीक तपशिलांसह मातंग समाजाच्या जीवन जाणिवांसह कादंबरीत येते. कादंबरीची व्याप्ती लक्षात घेता दोन भागात लेखक मुसळे यांनी तिचे लेखन केलेले आहे. कादंबरीच्या पहिल्या भागात मातंग समाजातील पहिल्या पिढीला सोसाव्या लागणाऱ्या यातना जगावे लागणारे अपमानित जिणे, गावकीची करावी लागणारी हलकी, सलकी कामे पारंपारिक कामामध्ये पिढ्यानपिढ्या जीवन कंठणारा मातंग समाजाचे विस्तृत विवेचन येते. तर दुसऱ्या भागात मातंग समाजाच्या दुसऱ्या पिढीचे विवेचन लेखक करतो. ही दुसरी पिढी समाजाच्या उध्दारासाठी सदैव प्रयत्नशील असलेली, शिकलेली आहे. लेखक मुसळे यांच्या मनात परिवर्तनवादी चळवळीची बीजे रुजल्याने दुर्लक्षित अशा समाजव्यवस्था, वेदनांचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न यशस्वीपणे 'वारुळ' कादंबरीत केलेला आहे.
मलिका अमर शेख ही मराठीतील एक वेगळे लेखन करणारी लेखिका आहे शाहीर अमर शेखांची कन्या आणि कवी नामदेव ढसाळ यांची पत्नी असे वलय जरी तिच्या नावाभोवती असले, तरी स्वतःच्या लेखनाने तिने लेखिका म्हणून स्वतःचे अस्तित्व सिध्द केले आहे.
त्यांच्या 'हॅंडल विथ केअर' (2007) या कादंबरीमध्ये एका सर्वसामान्य माणसाची कथा आहे. 'आपुल्या आयुष्यात काहीच नाही, हॉस्पिटलातल्या अळणी, बेचव, मिळमिळीत जेवणागत आयुष्य' असे आयुष्य असलेला हा माणूस आहे. त्याच्या आयुष्यात वेगवेगळ्या प्रलोभनांचे क्षण येतात. कधी हा क्षण आर्थिक स्वरुपाचा आहे, तर कधी स्त्री मोहाचा आहे. पण प्रत्येकक्षणी त्याची सद्सद्विवेकबुध्दी, त्याची जबाबदारीची जाणीव त्याला सगळ्या क्रिया—प्रतिक्रियांवर अंकुश ठेवत असते. मुंबईचे धावपळीचे जीवन, माणसामाणसातील नाती, मोर्चे, जमावाचा क्षोभ, त्यात सापडून भरडला जाणारा सामान्य माणूस असे व्यवहाराच्या पातळीवर राहणारे आणि तरीही एकमेकांत गुंतलेले असे समाजाचे चित्र या कादंबरीतून दिसते.
जसे स्वतःचे आयुष्य, स्वतःचे नातेसंबंध माणसाला 'हॅंडल विथ केअर' असे सांगत असतात, तसेच लेखिकेलाही तिची पात्रे 'हॅंडल विथ केअर' असे सांगत असतात. या कादंबरीवर अस्तित्ववादी विचारसरणीचा प्रभावही काही प्रमाणात जाणवतो. या सर्व दृष्टीने केवळ 97 पानांची ही कादंबरी आपला वेगळेपणा सिध्द करते.
शुभांगी भडभडे यांनीही अनेक सामाजिक विषयांवर कादंबरीलेखन केले आहे. त्यांचे लेखन लोकप्रिय ठरले आहे. त्यांच्या 'कृष्णसखा' (2002) या कादंबरीचा आवर्जून उल्लेख केला पाहीजे. ही कादंबरी समकालीन संदर्भातील अवयव तस्करी या समस्येला भिडते. ही कादंबरी एका डॉक्टरविषयी आहे. हा डॉक्टर किडनीचे स्मगलिंग करणारा आहे. त्याची पत्नी चारुता ही पारंपारीक पत्नीसारखी यात दाखवलेली नाही. आपली पती रक्षकाऐवजी भक्षक झाल्याचे पाहून ती त्याला पोलीसांच्या स्वाधीन करते. यात स्त्रीला केवळ 'पत्नी' या पारंपारीक प्रतिमेत बंदीस्त न करता 'एक कर्तव्यनिष्ठ जागरुक नागरिक' या भूमिकेत रंगवले आहे. ही नोंद घेण्यासारखी गोष्ट आहे.
ललिता गंडभीर यांची 'दहशतवादाची कथा' (2003) ही कादंबरी आहे. लाहोर जवळील गावातील एका कुटुंबाच्या तीन पिढ्यांची कथा यात आली आहे. सूडाच्या भावनेतुन दहशतवाद निर्माण होतो. हे यातील सूत्र आहे. तसेच प्रतिमा इंगोले यांची 'पार्टटाईम' ही कादंबरी शिक्षणक्षेत्रातील कडवट वास्तवाचे दर्शन घडवणारी आहे. लेखिकेचे य क्षेत्रातील अनुभव कादंबरीसाठी उपयुक्त ठरले आहेत.

समाजिक कार्यकर्त्या अरुणा सबाने यांची 'मुन्नी' (2010) ही कादंबरी एका वेश्येच्या आयुष्यावर लिहिलेली आहे. हे पुस्तक म्हणजे आत्मचरित्र किंवा आत्मचरित्रात्मक कादंबरी नव्हे, ही कादंबरीच आहे, असे ते लेखिकेने आवर्जून सांगितलेले आहे. वडिलांनी विकलेल्या लहान मुलीला सोडवण्याच्या केलेल्या प्रयत्नापासून कादंबरीची सुरुवात होत असल्यामुळे वाचकांची उत्सुकता वाढते. पुरुषी वासनांच्या शिकार होणाऱ्या, फसवल्या जाणाऱ्या, नवऱ्याने टाकून दिलेल्या मुलींचे रस्ते भोवटी वे यावस्तीला जाऊन मिळतात आणि त्यांचे आयुष्य भेसूर होत जाते. पण मुन्नीचे पुनवर्सन करण्याचा प्रयत्न यशस्वी होतो आणि तिचे आयुष्य चांगल्या वळणावर उभे ठाकते. समाजात अ ा किती स्त्रिया फसवल्या जात असतील आणि त्यांच्या आयुष्याची माती होत असेल हा विचार अस्वस्थ करणारा आहे.

**वैचारिक कादंबरी**

या प्रकारच्या कादंबऱ्या कधी ठराविक चौकटीत, तर कधी चौकट झुगारुन लिहिलेल्या आहेत कधी लेखन फसले आहे, पण मूळ गाभातल्या विचारांचे तेज जाणवल्यावाचून राहत नाही. अंबिका सरकार यांच्या कादंबऱ्यामधून साधारणपणे शहरी आणि सुसंस्कृत वातावरण दिसते. कधी मध्यमवर्गातील तर कधी उच्च मध्यमवर्गातील स्त्रियांचे जीवनसंघर्ष लेखिका प्रामाणिकपणे चित्रित करते. त्यातील स्त्रीकेंद्री आशयसूत्रे प्रभावी असतात.

अंत ना आरंभ ही' (2008) ही कादंबरी देखील एका स्त्रीच्या संघर्षमय आयुष्याचे समर्थ दर्शन घडवते. या कादंबरीत स्त्रियांची कुचंबणा, त्यांचा घेतला जाणारा गैरफायदा, त्यांच्याकडे केले जाणारे दुर्लक्ष, निष्क्रिय समाज इ. बऱ्याच प्रश्नांना हात घातला गेला आहे आणि त्या विरुध्द बंड करण्याचा प्रयत्नही दाखवला आहे हे खरोखरच स्तुत्य आहे.

शिक्षणाने व्यक्तिमत्व गवसलेल्या आणि त्यामुळे आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुध्द बंड करुन उठणाऱ्या, तसेच विचारपूर्वक आयुष्याचे निर्णय घेणाऱ्या, स्वतःचे ध्येय निश्चित असलेल्या आणि त्या दिशेने ठाम पावले उचलणाऱ्या स्त्री ाक्तीचे दर्शन या कादंबरीतून घडते. रेखा बैजल या वेगळा विचार देणाऱ्या लेखिका आहेत. अनेक विज्ञानकथा आणि वेगळ्याच पध्दतीची हाताळणी असलेल्या कादंबऱ्या त्यांनी लिहिलेल्या आहेत. 'मृत्यू जगलेला माणूस' 'प्रस्थान' 'जलपर्व' या त्यापैकी काही कादंबऱ्या आहेत. 'जलपर्व' या कादंबरीचा विषय समकालीन संदर्भात महत्वाचा आहे. पाणी टंचाईवर मात करण्यासाठी भारतातील नद्यांचे जाळे तयार करणे, हा विषय त्यात केंद्रस्थानी आहे.

स्त्री पुरुषांच्या नातेसंबंधातील विविध रंग उलगडून दाखविणारी आणि त्याचवेळी माणसाला जीवनातील नातेसंबंधाची गणिते स्वतःच्या मर्जीनुसार मांडता किंवा सोडवता येत नाहीत, हे दाखवणारी रेखा बैजल यांची 'प्रस्थान' (2010) ही कादंबरी होय.

**स्त्रीवादी कादंबऱ्या :**

या काळात प्रसिध्द झालेल्या स्त्रीकेंद्री कादबऱ्यांपैकी मेघना पेठे यांची 'नातिचरामि' आणि कविता महाजन यांच्या 'ब्र' आणि 'भिन्न' या तीन सर्वाधिक चर्चेचा विषय ठरलेल्या कादंबऱ्या आहेत. त्या कादंबऱ्यांवर स्त्रीवादी विचारसरणीचा प्रभाव आहे.

'नातिचरामि' (2005) ही मेघना पेठे यांची कादंबरी स्त्रीच्या व्यक्ती म्हणून असलेल्या स्वायत्त अस्तित्वाचा, प्रतिष्ठेचा, तिच्या आत्मसन्मानाचा आणि सध्याच्या समाजव्यवस्थेत या सर्वांच्या होत असलेल्या खच्चीकरणाचा प्रश्न प्रभावीपणे मांडतांना दिसते. आपल्या आत्मसन्मासाठी स्वायत्त अस्तित्वासाठी, प्रतिष्ठेसाठी वेगळी जीवनपध्दती स्वीकारलेल्या स्त्रीच्या वाट्याला येणारे पुरुषी मानसिकतेचे व वर्तनाचे वेगवेगळे अनुभव या कादंबरीत साकार झाले आहेत. कविता महाजन यांची 'ब्र' (2005) ही कादंबरी 'स्त्री'च्या 'स्व' च्या भोधाची कहाणी साकार करते. 'ब्र' ही कादंबरी एकाच वेळी 'प्रफुल्ला'चीही गोष्ट आहे आणि त्याचबरोबर तिच्या सारख्या अनेक स्त्रियांचीही प्रफुल्लाच्या मनात नवऱ्याविषयीचे विलक्षण भय आणि स्वतःविषयीची कमीपणाची भावना आहे. नवऱ्याने सोडल्यानंतर प्रफुल्ला एका संस्थेच्या अभ्यासप्रकल्पात काम करु लागते आणि या प्रकल्पात तिला भेटणाऱ्या अनेक ग्रामीण आदिवासी स्त्रिया आणि त्यांच्या हकिकतांमधून हळूहळू प्रफुल्ला सावरत जाते पंचायत समितीवर निवडून येऊनही या स्त्रियांना अन्याय, अत्याचाराला आणि पुरुषी वर्चस्वाला तोंड द्यावे लागणे या विविध पातळ्यांवर स्त्रियांचा चाललेला संघर्ष, 'ब्र' च्या अनुभवाला एक व्यापक परिमाण देतो.

कविता महाजन यांची 'भिन्न' ही दुसरी कादंबरी 'ब्र' प्रमाणेच वैशिष्ट्यपूर्ण स्वरुपाची आहे. रचिता, प्रतिक्षा आणि लेनिना या तीन मध्यवर्ती पात्रांच्या कथांच्या माध्यमातून या कादंबरीची रचना झालेली आहे. त्यापैकी रचिता ही एड्सग्रस्त रुग्ण आहे. लेनिना 'सोबत' नावाच्या संस्थेत एड्सग्रस्तांसाठी काम करते आहे. या तिघींचे एड्स या सूत्राने बांधलेले असणे कादंबरीत अर्थपूर्ण ठरते. पण 'भिन्न' मधील अनुभव त्याही पुढे जाऊन एकूणच समाजव्यवस्थेतील माणसाच्या वंचनेचा, विटंबनेचा आणि भोषणाच्या व्यापक अनुभव मांडण्याचा प्रयत्न करतो. मानवी नातेसंबंधाचे हळूहळू संपत जाणे आणि व्यक्ती एकाकी होत जाणे किंवा अनेकदा नातेसंबंध टिकवताना आत्मसन्मानाचा बळी द्यावा लागणे म्हणजेच आत्मसन्मान आणि एकाकीपण किंवा नातेसंबंध आणि आत्मवंचना या दोन पर्यायात निवड करावी लागणे, हे बिकट अनुभव 'नातिचरामि', 'ब्र' आणि 'भिन्न' या कादंबऱ्यांमधून साकार झाला आहे. किंबहुना स्त्रीवर लादल्या गेलेल्या भारीर अस्तित्वाचे भान या कादंबऱ्या प्रक ाने व्यक्त करतात.

**ऐतिहासिक कादंबरी**

'आदिपर्व' (2010) ही मालोजीराव भोसले यांच्या जीवनावर आधारित ऐतिहासिक कादंबरी आहे. लेखिका डॉ. प्रमिला जरग यांनी वीस वर्षे या कादंबरीचे लेखन केले. त्यांच्या मातोश्री कमलाबाई मोरे या स्वातंत्र्यसैनिक, सामाजिक कार्यकर्त्या, इतिहासाच्या अभ्यासक तसेच लेखिका होत्या.

डॉ. प्रमिला जरग यांनी आईची टिपणे वाचल्यावर त्यांच्या मनात मालोजीराव भोसले यांचे चित्र स्पष्ट होत गेले. त्या कादंबरीचे वैशिष्टये असे की, लेखिकेने त्या काळातील सामाजिक, राजकिय पार्श्वभूमी संपूर्णपणे चित्रफलका सारखी डोळ्यांसमोर उभी केलेली आहे. त्यातल्या राजकारणाचा उलगडा करत, त्यातले मालोजीरावांचे स्थान लक्षात घेतले आहे.

'परिवर्तन' (2007) ही माधवी देसाई यांची कादंबरी गोव्याच्या समाजजीवनावर आधारित आहे. स्वातंत्र्यलढ्याचा आधीचा काळातले गोव्याचे समाजजीवन यांच्यातला परिवर्तित होत जाणारा जीवनाचा प्रवाह लेखिकेला जाणवला आणि तोच तिने या कादंबरीत पकडण्याचा प्रयत्न केला.

निष्कर्ष :

1. कादंबरी हा वाङःमय प्रकार सर्वसमावेशक असल्यामुळे एकाच कादंबरीमध्ये ग्रामीण, प्रादेशिक, दलित, राजकिय, सामाजिक, कौटुंबिक, ऐतिहासिक, पौराणिक यातील काही विषयांचा समावेश होऊन प्रसंगांना व्यक्तिरेखांना अधिक उठावदार बनविले जाते.
2. एकविसाव्या भातकाच्या उंबरठ्यावर निर्माण झालेली 'तहान' या ग्रामीण कांबदरीने मात्र या साच्यातुन बाहेर पडून समाज वास्तवाचे भान आणून दिले आहे.
3. आजच्या ग्रामीण कादंबरीने ग्रामीण वास्तवाची व्यामिश्रता टिपण्याचा एक यशस्वी प्रयत्न केलेला दिसून येतो. 'बारोमास' (सदानंद देशमुख)
4. बाबाराव मुसळेंची 'वारुळ' ही कादंबरी मातंग समाजाचा इतिहास व वास्तव जाणून घेण्याचा दृष्टीने 'सामाजिक दस्तऐवज' ठरावी अ ी कादंबरी आहे.
5. 2001 ते 2010 या दशकातल्या स्त्रीलिखित व लेखकांच्या कादंबऱ्यांचा प्रतिनिधिक उदाहरणांच्या आधारे आढावा घेतला असता या उदाहरणांद्वारे असे दिसून येते की, कादंबरी या वाङःमय प्रकारातील वैचारिक, कादंबरी, सामाजिक कादंबरी ग्रामीण कादंबरी, स्त्रीवादी कादंबरी, ऐतिहासिक व चरित्रात्मक कादंबरी आदी प्रकार लेखक व लेखिकांनी हाताळले आहेत.
6. या लेखिकांना कुटुंबसंस्थेचे, नातेसंबधाचे भान आहे. वेगवेगळे नातेसंबंध त्यातील ताणेबाणे, व्यक्तींची मानसिकता संपूर्ण समाजातील व्यक्तीचे स्थान इ. अनेक महत्वाची आ ायसूत्रे स्त्रियांनी आपल्या कादंबऱ्यांमध्ये विचारात घेतली आहेत.

## संदर्भ


1. *मुसळे बाबाराव, 'वारुळ' (2004), साकेत प्रका ान, औरंगाबाद*
2. *श्री. ठाकुर रविंद्र, मराठी ग्रामीण कादंबरी, मेहता पब्लिकेशन हाऊस (1216) सदाशिव पेठ, पुणे*
3. *प्रा. देशमुख सदानंद, 'तहान', कॉन्टिनेन्टल प्रका ान*
4. *अमर शेख मलिका, 'हॅडल विथ केअर', पॉप्युलर, पुणे, 2007*
5. *डॉ. यादव आनंद, 'ग्रामीण साहित्य स्वरुप आणि समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे*
6. *फडके ना. सी., 'मराठी', कादंबरीची वाटचाल, परिसंवाद, पुणे*
7. *लोकसत्ता, पुणे, शुक्रवार, 24 डिसें. 2004*
8. *गणोरकर प्रभा व इतर (संपा), मराठी वाङःमय कोष, जी. आर. भटकळ, फाऊंडेशन, मुंबई 2004*
9. *डॉ. खांडगे मंदा, डॉ. गुंडी निलिमा, डॉ. आफळे ज्योत्सना, 'स्त्री साहित्याचा मागोवा', खंड 4, इ.स. 2001 ते 2010 साहित्यप्रेमी भगिनी मंडळ.*
10. *भडभडे शुभांगी, 'झंझावात' च्या निमित्ताने 'झंझावात', मनोरमा प्रकाशन, मुंबई 2000*